नियमीत दिवाणी मुकदमा क्र.५८/२०२३ मधील नि.६९ वरील आदेश

{लक्ष्मी नारायण ऑटो नोंदणीकृत भागीदारी तर्फे भागीदार प्रदिप दिनानाथ देसाई -वादी वि. रसिका मोहन वारंग वगैरे -प्रतिवादी }

अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत दाव्यातील नि. ४१ मधील आदेशामध्ये दावा मिळकत 'अ' चा नगरभुमापन क्रमांकचा उल्लेख करुन नि. ४१ च्या आदेशाप्रमाणे मोजणी काम करताना दावा मिळकतीची सर्वे क्र. ४२/अ१अ/२६क वर्णनाप्रमाणे व नगरभुमापन क्रमांक ३३४८ प्रमाणे हद्द दर्शवून त्याचा सविस्तर अहवाल मे. कोर्टाकडे सादर करण्याचे निर्देश मे. उपअधिक्षक भुमी अभिलेख, कुडाळ यांना देणेकरीता दाखल केला आहे.

२) वादींच्या कथनानुसार, प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीचे वर्णन सर्वे क्रमांक प्रमाणे तसेच नगरभुमापन क्रमांक प्रमाणे वर्णन दिलेले आहे. परंतु नि. ४१ च्या आदेशामध्ये भूमापन क्रमांकाचा उल्लेख करण्याचे राहून गेलेले आहे. दावा मिळकतीची केवळ सर्वे क्रमांक वर्णनाप्रमाणे मोजणी झालेस भविष्यात तांत्रिक दोष निर्माण होवू शकतात. सबब मे. उपअधिक्षक भूमी अभिलेख, कुडाळ यांना मोजणी करताना दावा मिळकतीची नगरभुमापन क्रमांकाप्रमाणे हद्द दाखविण्याचे निर्देश देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३) प्रतिवादी यांनी सदर अर्जावर नि. ७६ कडे आपले लेखी म्हणणे दाखल करुन अर्जास तिव्र हरकत नोंदवलेली आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी नगरभुमापन क्रमांकाचा उल्लेख मोजणी अर्जात केलेला नाही. सर्वे नंबर ४२/अ१अ/२६क या मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी बांधकाम केलेले नाही. प्रतिवादीने केलेले बांधकाम हे सर्वे नंबर ४२/अ१अ/२९ या मिळकतीमध्ये आहे. सबब दोन्ही मिळकती मोजण्यात याव्यात व प्रतिवादीने केलेले बांधकाम नकाशात दाखविण्याचा आदेश व्हावा व प्रस्तुतचा अर्ज नाकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४) वादींची दाव्यातील कथने विचारात घेता, दावा मिळकत 'अ' स. नं. ४२/अ१अ/२६क ही वादी यांच्या मालकीची असून सदर मिळकतीमध्ये कुडाळ

नगरपंचायत घर क. १४८५ ही मिळकत असून सदर मिळकतीचा नगर 'भूमापन क्रमांक ३३४८' असे नमुद केलेले आहे. तसेच दावा मिळकत 'ब' सर्वे नंबर ४२/अ१अ/२९ ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. प्रतिवादी यांनी वादी यांच्या मालकीच्या दावा मिळकत 'अ' मध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेकरीता उपअधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करुन दावा मिळकतींची सविस्तरपणे मोजणी करण्याचे व दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन केलेल्या बांधकामाबाबतचे मोजमापासह निश्चित क्षेत्र याचा सविस्तर अहवाल नकाशासह दोन महिन्याच्या आत न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

५) वादी यांनी नि. ४१ कडील न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती होणेकामी अर्जामध्ये दावा मिळकतीचे सविस्तर वर्णन केलेले नाही. तसेच वादी यांनी प्रस्तुत दाव्यात दावा मिळकत 'अ' चा नगरभूमापन क्र. ३३४८ असा दिलेला असून दावा मिळकत 'ब' चा नगरभूमापन क्रमांक दिलेला नाही. दावा मिळकतींची मोजणी नगरभुमापन क्रमांकाप्रमाणे करायची असल्यास दोन्ही मिळकतींचे भुमापन क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच नगरभुपान क्र. ३३४८ हा दावा मिळकत 'अ' चा भुमापन क्रमांक असून सदर मिळकतीचा सर्वे नंबर ४२/अ१अ/२६क असा आहे व दावा मिळकत 'ब' चा सर्वे क्रमांक ४२/अ१अ/२९ असा आहे. दावा मिळकत 'अ' व 'ब' या दोन्ही मिळकतींची मोजणी करण्याचे निर्देश नि.४१ वरील आदेशान्वये दिलेले आहेत. सबब भूमापन क्र. ३३४८ ची पुन्हा नगरभूमापन क्रमांकाप्रमाणे स्वतंत्र मोजणी करण्याची आवश्यकता नाही. करिता वादी यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादीचा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.05.10 16:43:12 +0530

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कुडाळ

ठिकाण : कुडाळ
दिनांक -१०/०५/२०२४